गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे | अंक ४४ वा | रविवार ३० जून २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 44 | Date : 30/06/2024 blow Sunday Page 4 Price 4

# चक दे इंडिया..! रोहितसेनेनं इतिहास रचला, भारताने १७ वर्षांनंतर टी-२० विश्वचषक जिंकला




## सूर्यकुमार यादवचा झेल आणि जसप्रीत बुमराहचे षटक ठरला टर्निंग पॉईंट

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दी न्यूज**

भारतीय संघाने १० वर्षांचा आयसीसी ट्रॉफिचा दुष्काळ संपवत भारताने टी-२० विश्र्वचषकाचे जेतेपद पटकावले आहे. सूर्यकुमार यादवचा अखेरच्या षटकातील झेल आणि जसप्रीत बुमराहच्या भेदक गोलंदाजीसह भारत टी-२० चॅम्पियन ठरला.. भारताने रोमहर्षक सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ७ धावांनी पराभव करत अंतिम सामन्यात आश्र्चर्यकारक विजय मिळवला आहे. रोहित शर्मा, हार्दिक पंड्यासारखे भारताच्या सर्वच खेळाडूंच्या डोळ्यातून विजयाश्रू आले.

शेवटच्या षटकाच्या शेवटच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या रोमहर्षक सामन्यात टीम इंडियाने १४० कोटी भारतीयांचे स्वप्न साकारले. २००७ मध्ये एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ चॅम्पियन बनला होता. त्यानंतर रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखालील भारतीय संघाने




विजय मिळवत सर्वांचे स्वप्न साकारले. सामन्यातील अखेरच्या षटकात हार्दिक पंड्याने । पान २ वर

### नरेंद्र मोदींकडून खास शुभेच्छा..

टीम इंडियाचे संपूर्ण नागरिकांकडून खूप खूप शुभेच्छा. आज १४० कोटी नागरिकांना तुमच्या या शानदार कामगिरीमुळे गर्व वाटत आहे. तुम्ही विश्र्वचषक जिंकला. पण आज तुम्ही देशातील प्रत्येक गल्लीत लोकांचे मन जिंकले आहे. हा टी-२० विश्र्वचषक एका वेगळ्या कारणामुळे स्मरणात राहील. एवढे सारे देश, एवढ्या साऱ्या टीम होत्या. पण भारताचा एकाही सामन्यात पराभव झालेला नाही. क्रिकेट जगतातील दिग्गज टीमचा तुम्ही सामना केला. तुम्ही शानदार विजय प्राप्त केला आहे. या सलग विजयांमुळे हा विश्र्वचषक रोमांचक झाला होता, असे नरेंद्र मोदी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणाले.

## जालन्याच्या दाम्पत्यासह तिघांविरुद्ध गुन्हा स्टेट बँकेतील नोकरीचे आमिष दाखवून तरुणाला आठ लाखांचा गंडा

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

भारतीय स्टेट बँकेत लिपीकपदाची नोकरी देण्याचे आमिष दाखवून सोलापुरातील एका तरुणाला आठ लाख रुपयांचा गंडा घातल्याप्रकरणी जालना येथील एका दाम्पत्यासह तिघाजणांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. व्यंकटेश नागनाथ चौगुले (वय ३४, रा. अशोक चौक, न्यू पाच्छा पेठ, सोलापूर) असे फसवणूक झालेल्या तरुणाचे नाव असून त्याने जेलरोड पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार निर्मला रणधीर परदेशी व तिचा पती रणधीर तुळशीराम परदेशी आणि अब्दुल माजीद खान (तिघे रा. जालना) यांच्या विरुद्ध फसवणुकीचा । पान २ वर

## रोहित शर्मा, विराट कोहलीची सर्वात मोठी घोषणा, आंतरराष्ट्रीय टी २० क्रिकेटमधून निवृत्त..



**बारबाडोस /दैनिक यशसिध्दी न्यूज**

भारताला दुसऱ्यांदा टी २० वर्ल्ड कपचं विजेतेपद मिळवून दिल्यानंतर संघाचा कॅप्टन रोहित शर्मा आणि अनुभवी फलंदाज विराट कोहली या दोघांनी मोठा निर्णय घेतला आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधून निवृत्त झाले आहेत. भारतानं २००७ नंतर टी २० वर्ल्ड कप जिंकला. यानंतर दोन्ही दिग्गजांनी हिच ती वेळ म्हणत निवृत्तीचा निर्णय जाहीर केला.भारतानं टी २० वर्ल्ड । पान २ वर

## 'जेडीयू'च्या कार्याध्यक्षपदी संजय कुमार झा, पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत निर्णय

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

जनता दल युनायटेड (जेडीयू) पक्षाची आज राष्ट्रीय कार्यकारिणीची दिल्लीत बैठक पार पडली. या बैठकीत जेडीयूचे राज्यसभा खासदार संजय कुमार झा यांच्यावर मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. खासदार संजय कुमार झा यांची जेडीयूच्या कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. जेडीयूच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत पक्षाचे अध्यक्ष आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी संजय कुमार झा यांना कार्याध्यक्ष करण्याचा प्रस्ताव मांडला.



त्यानंतर जेडीयूच्या कार्याध्यक्षपदी संजय कुमार झा यांची निवड करण्यात आली.केंद्रात असलेल्या एनडीए सरकारमध्ये जनता दल युनायटेड हा महत्वाचा पक्ष आहे. जनता दल युनायटेड पुन्हा एकदा एनडीएमध्ये सहभागी होताना संजय झा यांनी महत्वाची भूमिका बजावल्याचं बोललं जातं. आता खासदार संजय कुमार झा यांच्यावर पक्षाच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आल्यानंतर त्यांना भारतीय जनता पक्षाबरोबर चांगला समन्वय ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर असणार आहे. यासंदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाइम्सने दिलं आहे.

आगामी बिहार विधानसभेच्या निवडणुका । पान २ वर

## सहकारी पक्षांबरोबरच राहून विधानसभेत बहुमत मिळविण्याची भाजपची रणनीती

**मुंबई/दैनिक यशसिध्दी न्यूज**

लोकसभा निवडणुकीत भाजपचा राज्यात मोठा पराभव झाल्याने आणि त्याचे खापर महायुतीतील नेते एकमेकांवर फोडत असताना सहकारी पक्षांबरोबर राहूनच विधानसभा निवडणूक लढवायची आणि बहुमत मिळवायचे, अशी रणनीती भाजपने निश्र्चित केली आहे.राज्याचा अर्थसंकल्प सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू ठेवून मांडला आहे.

त्यामुळे योजना जनतेपर्यंत पोचविण्यासाठी सहकारी पक्षांच्या कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन १० जुलैपर्यंत अभियान राबविण्याचा निर्णय भाजपच्या केंद्रीय नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या विस्तारित सुकाणू समितीच्या बैठकीत शनिवारी घेण्यात आला.

विधानसभा निवडणुकीत जागावाटपावरून वाद होण्याची शक्यता आहे. या पार्श्र्वभूमीवर भाजपच्या केंद्रीय नेत्यांच्या उपस्थितीत प्रदेश भाजपच्या विस्तारित सुकाणू समितीची बैठक प्रदेश कार्यालयात झाली. लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुका व त्रुटी दूर करून विधानसभा निवडणुकीची तयारी कशी करायची, याविषयी बैठकीत चर्चा झाली.सहकारी पक्षांबरोबर विधानसभा निवडणूक लढवायची आणि बहुमत मिळवायचे, अशी रणनीती भाजपने निश्र्चित केली असून त्या अनुषंगाने । पान २ वर

## विधानसभेत रिपब्लिकन पक्षाचे आमदार निवडुण आणण्याच्या तयारीला लागा

### केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे रिपब्लिकन कार्यकर्त्यांना आवाहन

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

आगामी विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाची भाजप महायुती सोबत युती निश्र्चीत असुन महायुतीतुन रिपब्लिकन पक्षाच्या चिन्हावर किमान ६ आमदार निवडुण आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी तयारीला लागावे.नागालँडच्या विधानसभेत आरपीआय चे आमदार निवडुन येऊ शकतात मग महाराष्ट्राच्या विधानसभेत आरपी आय चे आमदार यंदा निवडून आलेच पाहिजेत.असा निर्धार करा.असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज मुंबईत केले.



यशवंतराव चव्हाण सेंटर येथे रिपब्लिकन पक्षाच्या राज्य कार्यकारणीची महत्वपुर्ण बैठक रिपाइंचे राज्य अध्यक्ष राजा सरवदे यांच्या अध्यक्षतेत संपन्न झाली.त्यात ना.रामदास आठवले यांनी लोकसभा निवडणुकीतील महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हातील पक्षाच्या कामाचा आढावा घेतला.यावेळी रिपाइं चे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर,राज्य सरचिटणिस गौतमभाऊ सोनावने,राज्य कार्यअध्यक्ष बाबुराव कदम,भुपेश थुलकर,युवक आघाडीचे पप्पु कागदे,महिला आघाडीच्या राज्य अध्यक्षा चंद्रकाता सोनकांबळे,मुंबई प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ कासारे,दयाळ बहादुरे,अण्णा रोकडे,अॅड.आशाताई लंके आदि अनेक मान्यवर उपस्थित होते.

संपूर्ण महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत सर्व मतदार संघात रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांनी महायुतिचा चांगला प्रचार केला.त्याबद्दल ना.रामदास आठवले यांनी समाधान व्यक्त केले.रिपब्लिकन कार्यकर्त्यांना दलित पँथरच्या चळवळीत कार्यकर्ता अन्याय । पान २ वर

## मंगळवेढा बस स्थानकाच्या सुधारणेसाठी मंजूर दोन कोटी २८ लाखाच्या कामाचा आज शुभारंभ

**मंगळवेढा/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या निधीतून मंगळवेढा तालुक्यातील एसटी स्टँडच्या सुधारण्यासाठी दोन कोटी २८ लाख रुपये आमदार समाधान आवताडे यांनी मंजूर करून आणले असून त्यामधून परिसर सुधारणा करणे,कॉंक्रिटीकरण करणे या कामाचा शुभारंभ रविवारी सकाळी नऊ वाजता होणार असुन या कार्यकर्त्यांनी सकाळी नऊ वाजता मंगळवेढा बसस्थानक येथे उपस्थित राहण्याचे आवाहन बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ अवताडे यांनी केले आहे.



काही दिवसांपूर्वी आमदार समाधान आवताडे यांनी बसस्थानकात भेट देऊन बस स्थानकाची परिस्थिती जाणून घेतली होती त्यावेळी बस स्थानकातील अवस्था पाहून त्यांनी आगार प्रमुखांना दुरुस्ती व स्वच्छतेसाठीचा प्रस्ताव तयार करून देण्यास सांगितले होते त्यानुसार बस स्थानकाच्या सुधारण्यासाठी प्रस्ताव तयार करून मंगळवेढा आगार प्रमुखांनी आमदार आवताडे यांचे मार्फत शासनास सादर केला होता, त्यानुसार बस स्थानक परिसर कॉंक्रिटीकरण करणे व परिसराची सुधारणा करणे या कामासाठी दोन कोटी २८ लाख रुपये मंजूर झाले आहेत त्या कामाचा शुभारंभ आमदार समाधान आवताडे यांच्या उपस्थितीत रविवारी सकाळी नऊ वाजता होणार असल्याचे बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ अवताडे यांच्याकडून सांगण्यात आले.

# संपादकीय

## परिपक्वता आणि वैचारिक वारसा

तब्बल दहा वर्षांनंतर विरोधी पक्ष नेता मिळाला आहे. राहुल दोन दशकांपासून संसदीय राजकारणात आहेत. ते सलगपणे लोकसभेचे सदस्य म्हणून या काळात निवडून आले आहेत. यातील निम्मा काळ त्यांच्या पक्षाचे सरकार केंद्रात होते. गांधी घराण्याचे वलय पाहता राहुल तेव्हा पंतप्रधानही होऊ शकले असते. मात्र, त्यांनी एक खासदार म्हणून राहणे आणि पक्षसंघटनेत काम करण्याला पसंती दिली. आता त्यांनी विरोधी पक्षनेतेपद स्वीकारून घटनात्मक जबाबदारी स्वीकारली आहे. नवी जबाबदारी सांभाळताना त्यांना अनेक आव्हाने पेलावी लागणार आहेत. त्यात प्रामुख्याने स्वपक्षीयांना आणि उत्साही मित्रपक्षांनाही आवर घालावा लागणार आहे. लोकसभा निवडणुकीचा निकाल खरेतर अत्यंत चोख न्याय देणारा ठरला. भाजपला डोक्यावरचा सूर्य मावळणारच नाही अशी दर्पोक्ती होती. दोन टर्म पूर्ण बहुमताने त्यांचे सरकार होते. कोणाच्या कुबड्यांची त्यांना आवश्यकता भासली नाही आणि कोणाला विनंत्या-आर्जवही करावे लागले नाहीत. त्यांना वाटले ते निर्णय त्यांच्या सरकारने धडाडीने घेतले. वास्तविक लोकशाहीत सगळ्यांशी म्हणजे त्यात विरोधकही आले, सल्लामसलत करून पुढे जायचे असते. ती प्रक्रिया गेल्या दशकात थांबली. त्याला कारण विरोधी पक्ष क्षीण झाला होता. सभागृहात कोणी नेताच नव्हता आणि जे होते ते शक्तीपात झालेले गट होते. ही निश्चितच आदर्श स्थिती नव्हती. जेव्हा अशी स्थिती उद्भवते तेव्हा सरकार निरंकुश होण्याची शक्यता अधिक असते. त्यातून काही चुकीचे निर्णय घेतले जातात आणि त्याचे परिणाम सगळ्यांनाच भोगावे लागतात. त्या न्यायाने विचार करता यावेळेचा जनादेश सगळ्यांना स्थिर करणारा आहे. अनेक महत्त्वाच्या समित्यांच्या आणि संस्थांच्या प्रमुखांच्या नियुक्त्यांमध्ये विरोधी पक्ष नेत्याचा सहभाग असतो. त्यावेळी अनावश्यक कटुता संघर्षाला चालना देणारीच ठरेल व विरोधी पक्षनेत्याच्या समावेशाच्या मूळ हेतूलाच त्यामुळे हरताळ फासला जाईल. एकदा जनतेने कौल दिला की निवडणुकीतील कटुता मागे ठेवत सामोपचाराने काम करण्याची अपेक्षा केली जाते. परस्परांवर चिखलफेक झाली आहे. त्याचे डाग मनातून पुसून टाकावे लागतील. सरकार आणि विरोधक यांचे विश्वासाचे, आदराचे नाते निर्माण करावे लागेल. राजकीय मतभेद बाजूला ठेवून देशाचा व्यापक विचार करून निर्णय घ्यावे लागतात आणि तसे वागावेही लागते. राहुल यांच्याकडे तेवढा अनुभव, परिपक्वता आणि वैचारिक वारसा आहे. तो जपत त्यांना वाटचाल करावी लागणार आहे.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म दिवस प्रत्येक व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करावा

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ५३ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजी नगर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

समाज जीवनात कार्यरत बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका आणि त्यावेळी व्यक्त केलेले विचार समजून घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांना ज्ञात आहेच की, २२ मार्च १९२० ला माणगांव परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म दिवस प्रत्येक व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करावा. या विधानाच्या १०४ व्या वर्धापनदिनानिमित्त आणि शाहू महाराजांच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्त, वर्तमान काळात आपण कुठे आहोत? समग्र चळवळीचे नेतृत्व, कार्यकर्ते, संस्था, संघटना, अनुयायी, हितचिंतक नेमके काय करीत आहेत? आपली त्यात भागीदारी किती? यावर विचारमंथन व्हावे म्हणून सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन आईनाच्या संयुक्त विद्यमाने ५३ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे २३ जून २०२४ ला आयोजन करण्यात आले होते.



या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद हेरोडे म्हणाले की, शाहू महाराज कोल्हापूर संस्थानात मराठा साम्राज्याचे राजे होते. त्यांनी डॉ. आंबेडकर हेच तुमचे खरे पुढारी असतील असे जाहीर केले होते. त्या काळात सर्व क्षेत्रात ब्राह्मणांचा भरणा पहायला मिळत होता. राजाराम कॉलेजात ७६ पैकी ७१ ब्राह्मण तर ५ ब्राह्मणेत्तर होते. इंदिरा साहनी केस मुळे आरक्षणाला ५० टक्क्यांची मर्यादा घालण्यात आली तसेच क्रिमी लेअर ची तरतूद केल्याने आर्थिक बाबींचा जन्म झाला. ज्याची तरतूद भारताचे संविधानात नाही. त्यामुळे बिहार राज्याने देऊ केलेले ५० टक्क्याच्या वरील आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने रद्द ठरविले आहे. उर्वरीत ५० टक्के आरक्षण खुले ठेवण्यात आले ते विशिष्ट प्रवर्गासाठी नसून सर्वांसाठी खुले आहे. ही तरतूद आता सर्व खाजगी संस्थाना सुद्धा बंधनकारक करने आवश्यक आहे. तरुणांना प्रशिक्षित करण्याची गरज असून सर्वांनीच कृतीशील होण्याची आवश्यकता आहे. सध्या आरक्षण वाद्यांची संख्या वाढत आहे हे शाहू महाराजांच्या कार्याचे फलित आहे.

याप्रसंगी एड. आर. टी. खंदारे म्हणाले की, माणगांव परिषद कोल्हापूर सारख्या शहरात न घेता माणगांवला का घेण्यात आली यामागील रणनीती आपण समजून घेतली पाहिजे. वर्तमान पत्रात डिप्रेस्ड क्लास मिशनचे वि. रा. शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक भूमिकेविषयी लेख छापून आल्याने शाहू महाराजांना दादू कोंडू पाटील व गंगाराम कांबळे सोबत आंबेडकरांना भेटायला मुंबईला जावे लागले होते. परिणामी सायमन कमिशनने मागासवर्गीयांना देऊ केलेल्या अधिकाराची अंमलबजावणी व्हावी म्हणून माणगांव परिषद भरविण्यात आली होती. राहूल मेश्राम म्हणाले की, वर्षभरात अनेक महापुरुषांच्या जयंती असतात त्या सर्व महापुरुषांच्या जयंती आपण साज-या केल्या पाहिजेत. त्या सर्वांच्या योगदानामुळे आपले अस्तित्व आहे. भुतकाळात आपणास कान, नाक, डोळे यांचा वापर करण्याची परवानगी नव्हती,पण ती आज आहे.त्याचा आपण सदुपयोग केला पाहिजे. एस. ए. कानडे म्हणाले की, स्पृश्यअस्पृश्यातील दरी कमी करण्यासाठी सामाजिक भान असल्याने शाहू महाराजांनी गंगाराम कांबळे यांना हॉटेल टाकून दिले होते. ज्यात ते स्वतः मित्र मंडळी सोबत चहा घ्यायला जात असत. महेंद्र खिल्लारे म्हणाले की, समाजाचे भान आणि शान असणा-या शाहू महाराजांच्या जयंती निमित्त ही कार्यशाळा आयोजित केली आहे. शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही याची जाणीव ठेवून शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहाची सोय केली होती. मूकनायक सारखे वर्तमान पत्र चालविण्यासाठी आर्थिक सहकार्य केले होते. मागासवर्गीय तरूण गाफील असून चळवळीपासून ते कोसो दूर आहेत. टी. एन. थोरात म्हणाले की, आरक्षणाचे निर्माते शाहू महाराज यांनी मागासवर्गीयांना प्रोत्साहित करीत होते, याचाच एक भाग म्हणून त्यांनी गंगाराम कांबळे यांना हॉटेल काढून दिले होते. शाहू महाराजांच्या प्रेरणेतून बाबासाहेब घडले त्यामुळे आपले अस्तित्व आहे. डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, शाहू महाराजांनी सर्व क्षेत्रात कार्य केले आहे. शाळेत गैरहजर राहणा-या विद्यार्थ्यांना दंडित करण्याचा आदेश त्यांनी काढला होता.

प्रमुख वक्ते एड. ईश्र्वर नरोडे म्हणाले की, १९३५ ते ३७ च्या काळात बाबासाहेब जिथे होते त्याच संस्थेतून मुंबई येथे शिक्षण घेतले आहे. एड. राजू बागूल उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला जाणार असल्याची जाणीव करून दिली. जी चळवळ शेकडो वर्षापूर्वी उभी राहिली तिचे परिणाम आज आपणाला पहायला मिळत आहेत. ज्याच्या नळाला पाणी येत नाही ते कार्यक्रमाला कसे येतील? म्हणून पोटाचा प्रश्र्न सोडवून समाजकार्यासाठी पुढे आले पाहिजे. समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या सर्व वर्तमान पत्राच्या संपादक व टीमचे आभार व्यक्त करतो ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्यांना ठळक प्रसिद्धी दिली आहे. राजर्षी शाहू महाराजांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना मूकनायक सारखे वर्तमान पत्र चालविण्यासाठी आर्थिक मदत दिली होती. यातून वृत्तपत्राचे महत्त्व अधोरेखित होते. थांबवू शकणार नाहीत.

या कार्यशाळेला महेंद्र खिल्लारे, राहूल मेश्राम, एड. ईश्र्वर नरोडे, नितेश तायडे, टि. झेड. हटकर, एस. ए. कानडे, बी. बी. मेश्राम, डॉ. व्ही. एच. कांबळे, टी. एन. थोरात, एड. आर. टी. खंदारे, प्राचार्य डॉ प्रमोद हेरोडे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

पान १ वरुन

## विधानसभेत रिपब्लिकन पक्षाचे..

विरुध्द पेटून ऊठत होता.तसेच आजही रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी पँथर सारखे आाढमक होऊन. अन्याया विरुध्द पेटून उठावे.अन्याया विरुध्द ज्यांना राग येत नाही.ती चळवळ जीवंत मानली जात नाही.अन्याया विरुध्द लढताना कोणाचाही मुलाहिजा न ठेवता संघर्ष केला पाहिजे असे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले.रिपब्लिकन पक्षाला एक विधान परिषद सदस्यत्व,विधानसभा निवडणुकीत किमान १० जागा आणि राज्य सरकारच्या मंत्री मंडळात एक मंत्री पद मिळावे अशी मागणी रिपाइं च्या बैठकीत करण्यात आली.केंद्रीय मंत्री मंडळात रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना.रामदास आठवले यांना तिसऱ्यांदा केंद्रिय राज्य मंत्री पद दिल्या बद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानणारा ठराव रिपाइं च्या राज्य कार्यकारणिच्या बैठकीत मंजुर झाल्याची माहीती रिपाइं चे राज्य सरचिटणीस गौतम सोनावने यांनी दिली.

## 'जेडीयू'च्या कार्याध्यक्षपदी

डोळ्यासमोर ठेवून खासदार संजय कुमार झा यांच्यावर ही जबाबदारी देण्यात आल्याचं बोललं जात आहे. काही महिन्यांपूर्वीच संजय कुमार झा यांची राज्यसभेचे खासदार म्हणून वर्णी लागली होती. संजय कुमार झा यांच्या नियुक्तीवर बिहार सरकारमधील मंत्री अशोक चौधरी म्हणाले की, त्यांच्या नियुक्तीमुळे पक्षाचा संपूर्ण भारतातील पाया विस्तारण्यास मदत होईल.दरम्यान, जनता दल युनायटेड (जेडीयू) पक्षाची आज राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक पार पडली. या बैठकीला पक्षाचे कार्यकारिणी सदस्य, सरचिटणीस, सचिव आणि प्रदेशाध्यक्षासह पक्षाचे सर्व खासदार आणि मंत्री उपस्थित होते. या बैठकीत काही दिवसांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत आलेल्या यशाचा आणि ज्या मतदारसंघात उमेदवारांचा पराभव झाला, यावर विचारमंथन करण्यात आले. तसेच २०२५ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या रणनीती संदर्भातली विविध विषयांवर चर्चा झाली, असं सांगितलं जात आहे.

## चक दे इंडिया..! रोहितसेनेनं..

दमदार गोलंदाजी केली. भारताला विजयासाठी ६ षटकांत १६ धावांची गरज होती. तर मैदानात मिलर आणि केशव महाराजची जोडी होती. हार्दिकने फुलटॉस चेंडू टाकला जो मिलरने जोरदार फटका लगावला पण सीमारेषेवर उभा असलेल्या सूर्याने आश्चर्यकारक झेल टिपला आणि भारताच्या दिशेने सामना फिरवला.बुमराहने भेदक गोलंदाजी करत पुन्हा एकदा भारताच्या विजयाच्या आशा वाढवल्या. या षटकात बुमराहने चौथ्या चेंडूवर यान्सनला क्लीन बोल्ड केले. या सामन्यात एके काळी दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा विजय निश्र्चित दिसत होता, त्यानंतर जसप्रीत बुमराहने १६ व्या षटकात केवळ ४ धावा दिल्या आणि १८व्या षटकात केवळ २ धावा दिल्यावर मार्को यान्सनची विकेटही घेतली, त्यामुळे भारतीय संघाने या सामन्यात पुनरागमन करण्यात यश मिळवले आणि येथून आफ्रिकन संघावरही दडपण आणले. अर्शदीप सिंगने १९व्या षटकात ४ धावा दिल्या, तर हार्दिकने शेवटच्या षटकात केवळ ८ धावा देत टीम इंडियाला ७ धावांनी विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

१७७ धावांच्या प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेच्या संघाला २० षटकांत ८ विकेट गमावून केवळ १६९ धावा करता आल्या आणि भारतीय संघाने ७ धावांनी सामना जिंकला. टीम इंडियाच्या गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. अर्शदीप सिंग, हार्दिक पंड्या आणि जसप्रीत बुमराह हे टीम इंडियाच्या विजयाचे सर्वात मोठे हिरो ठरले. अर्शदीप सिंग आणि जसप्रीत बुमराह यांनी ६ पेक्षा कमी इकॉनॉमीवर धावा दिल्या आणि २-२ विकेट घेतल्या. त्याचवेळी हार्दिक पांड्याने २० धावांत ३ विकेट घेतले. प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने २० षटकांत ७ गडी गमावून १७६ धावा केल्या. संथ खेळपट्टीवर पॉवरप्लेमध्ये ३ बाद ३४ धावा अशी परिस्थिती असताना भारतीय फलंदाजांनी दमदार पुनरागमन केले आणि टी-२० विश्र्वचषकाच्या फायनलमध्ये सर्वोच्च धावसंख्या केली. या इनिंगमध्ये विराट कोहलीने टीम इंडियासाठी सर्वाधिक धावा केल्या. विराट कोहलीने ५९ चेंडूत ७६ धावा केल्या. यादरम्यान त्याने ६ चौकार आणि २ षटकार मारले.

## रोहित शर्मा, विराट कोहलीची सर्वात..

कपच्या अंतिम फेरीच्या लढतीत दक्षिण आफ्रिकेवर ७ धावांनी विजय मिळवत इतिहास रचला. तब्बल १७ वर्षानंतर भारतानं टी २० वर्ल्ड कप जिंकला. या वर्ल्ड कप विजयासह भारतीय क्रिकेटमधील दोन महान क्रिकेटपटूंनी आपल्या आंतरराष्ट्रीय टी २० कारकिर्दीला पूर्णविराम द्यायचं ठरवलं. विराट कोहलीनं मॅच संपल्यानंतरच निवृत्तीचे संकेत दिले होते. रोहित शर्मानं यानंतर निवृत्तीबाबत घोषणा केली.

रोहित शर्मानं आंतरराष्ट्रीय टी२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करताना म्हटलं की गुड बाय म्हणण्यासाठी आताच्या सारखी चांगली वेळ नाही. यंदाच्या टी २० वर्ल्ड कपमध्ये विजेतेपद मिळवण्यासाठी आतूर होतो. आम्ही ती रेषा पार केली आहे त्यामुळं आनंद होतोय, असं देखील रोहित शर्मानं म्हटलं.

रोहित शर्मानं भारतासाठी १५९ आंतराष्ट्रीय ट्वेन्टी ट्वेन्टी सामन्यांमध्ये क्रिकेट खेळलं. यामध्ये ३२.०५ च्या सरासरीनं त्यानं १४०.८९ च्या स्ट्राइक रेटनं ४२३१ धावा केल्या. रोहित शर्माच्या नावावर आंतरारष्ट्रीय ट्वेन्टी ट्वेन्टीमध्ये ५ शतकांची तर ३२ अर्धशतकांची नोंद आहे. रोहित शर्मा २००७ आणि २०२४ च्या टी २० वर्ल्ड कप विजेत्या संघाचा सदस्य आहे.

आता नव्या पिढीनं जबाबदारी स्वीकारण्याची वेळ आली आहे. हा माझा शेवटचा टी२० वर्ल्ड कप होता. जे मिळवायचं होतं ते मिळालं आहे. एक दिवस तुम्हाला वाटतं की तुम्ही धावा काढू शकत नाही आणि असं होतं. भगवान महान आहे. फक्त संधी, आताच नाही तर कधी नाही अशी स्थिती होती. भारतासाठी खेळण्याचा टी २० क्रिकेटमधील अखेरचा सामना होता. आम्हाला वर्ल्ड कप उंचावायचा होता, आम्ही तो उंचावला आहे. हे एक खुलं गुपित होतं, मॅच हरलो असतो तरी जाहीर करणार होतो. पुढच्या पिढीनं टी२० क्रिकेट पुढं घेऊन जायची वेळ आली आहे. आमच्यासाठी ही दीर्घकाळ प्रतीक्षा होती. एक आयसीसी ट्रॉफी जिंकण्यासाठी वाट पाहावी लागते. रोहितनं ९ वर्ल्ड कप खेळले आहेत. माझा सहावा वर्ल्ड कप आहे. रोहित आजच्या यशाचा हकदार आहे, असं विराट कोहली म्हणाला.

## सहकारी पक्षांबरोबरच राहून

विस्तृत चर्चा झाली. भाजपला सर्वसामान्य जनतेचा आशीर्वाद असल्याने विधानसभेत बहुमत मिळेलच. असे शेलार यांनी बैठकीनंतर पत्रकारांना सांगितले.

भाजपच्या प्रदेश पदाधिकाऱ्यांची १३ जुलै रोजी तर विस्तारित कार्यसमितीची १४ जुलै रोजी पुण्यात बैठक होणार आहे. या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उपस्थित राहण्याची शक्यता आहे. विस्तारित कार्यसमितीच्या बैठकीसाठी राज्यभरातील सुमारे चार हजार पदाधिकाऱ्यांना निमंत्रित करण्यात आल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

## स्टेट बँकेतील नोकरीचे..

गुन्हा दाखल झाला आहे. २०२० पासून चार वर्षांत चौगुले यास नोकरीच्या आमिषाने लुबाडले जात होते.

व्यंकटेश चौगुले हा उच्च शिक्षणानंतर २०२० साली नोकरीच्या शोधात पुण्यात गेला होता. तेथे भारतीय स्टेट बँकेच्या क्रेडिट कार्ड शाखेत त्यास नोकरी मिळाली होती. तेथेच निर्मला परदेशी ही देखील नोकरीस असल्याने त्यांच्यात चांगले संबंध निर्माण झाले होते. दरम्यान, निर्मला परदेशी हिने नोकरी सोडल्यानंतर काही दिवसांनी व्यंकटेश यास संपर्क साधून आपणास स्टेट बँक आफ इंडियामध्ये लिपीकपदावर नोकरी लागल्याचे सांगितले. ही नोकरी आपल्या पतीचे ओळखीचे अब्दुल माजीद खान यांच्या मार्फत लागल्याचे सांगितले. खान हेसुद्धा याच बँकेत सेवेत असून बँकेच्या नोकर भरती प्रक्रियेत समितीवर ते कार्यरत असून त्यांच्या मार्फत नोकरीसाठी अनामत पाच लाख रुपये द्यावे लागतात, असे सांगून निर्मला परदेशी हिने भुरळ पाडली. व्यंकटेश याने आई-वडिलांच्या सेवानिवृत्तीनंतर मिळालेल्या रकमेची जुळवाजुळव करून देण्याची तयारी केली असता निर्मला परदेशी हिने आणखी दोन लाख रुपये द्यावे लागतील, असे कळविले. तथापि, यात फसवणूक होण्याची चिन्हे दिसत असल्यामुळे सावध झालेल्या व्यंकटेशने दिलेली आठ लाखांची रक्कम परत मागितली. ही रक्कम देण्यास टाळाटाळ होत असल्यामुळे अखेर त्याने पोलिसांत धाव घेतली.

# निवडणूक वर्षात योजनांप्रमाणे कर्जातही वाढ; १ लाख ३० हजार कोटींचे कर्ज घेण्याचे प्रस्तावित 'विकासकामांसाठी यंदा अधिकचे कर्ज'

मुंबई : निवडणूक वर्ष असल्याने विविध समाज घटकांना खूश करण्याकरिता अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेल्या योजनांवर सुमारे एक लाख कोटी खर्च होणार असतानाच दुसरीकडे यंदा कर्जही जास्त काढावे लागणार आहे.




तशी कबुलीच सरकारने अर्थसंकल्पीय कागदपत्रांमध्ये दिली आहे.

सरकारवर आधीच सात लाख कोटींपेक्षा अधिक कर्जाचा बोजा असताना चालू आर्थिक वर्षात (२०२४-२५) पायाभूत सुविधांचे प्रकल्प राबविण्यासाठी सरकारी खर्चात वाढ संभाव्य असल्याची कबुलीच सरकारने दिली आहे. यंदा १ लाख ३० हजार कोटींचे कर्ज काढण्याची योजना आहे. राज्यावर २०२३-२४ अखेर ७ लाख ११ हजार कोटींचे कर्ज होते. दरवर्षी ६० ते ७० हजार कोटींचे कर्ज काढले जाते. यंदा १ लाख ३० हजार कोटींचे कर्ज काढण्यात येणार आहे. निवडणूक वर्ष असल्याने सरकारने सुमारे एक लाख कोटी रुपयांच्या विविध योजनांची घोषणा केली आहे. या घोषणांची पूर्तता करण्याकरिता निधीची आवश्यकता आहे. विविध समाज घटकांना खूश करण्याकरिता निधी खर्च करण्यात येणार असताना विकासकामांवरील खर्चात कपात करण्यात आली आहे. या पार्श्र्वभूमीवर यंदा जादा कर्ज काढून पायाभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# नागणसुर केंद्राचे पहिले शिक्षण परिषद उत्साहात संपन्न



**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज :**
तालुक्यातील नागणसुर केंद्राचे पहिले शिक्षण परिषद मोठ्या उत्साहात संपन्न झाले. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पहिले शिक्षण परिषद सितामता ज.शेळके प्रशालेत जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुली शाळेच्या सहकार्याने पार पडले.शिक्षण परिषदेच्या अध्यक्षस्थानी केंद्र प्रमुख शिवाजी शिंदे होते.व्यासपीठावर शिवाजी शिंदे,पंडित गुरव,विद्याधर गुरव,शंकर व्हनमाने,राम सोलापूरे,राजशेखर करपे,बसनिंगय्या स्थावरमठ, मल्लप्पा कवठे,बसवराज खीलारी,गुरुनाथ नरूणे उपस्थित होते.प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले प्रतिमा पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. जि.प.कन्नड मुली शाळेतील विद्यार्थिनी आदर्श परिपाठ घेतले.या वेळी नुकतेच कन्नड मुली शाळेतील मुख्याध्यापक मल्लप्पा कवठे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त केंद्राचे वतीने सत्कार करून पुढील आरोग्यदायी जीवनासाठी शुभेच्छा देण्यात आले.तसेच पदोन्नतीने मुख्याध्यापकपदी निवड झालेल्या आणि तालुका, जिल्हांतर्गत बदली झालेल्या शिक्षकांच्या सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले.

शिक्षण परिषदेच्या विषयाप्रमाणे शिवाजी शिंदे,पंडित गुरव ,सुनील राठोड,राजश्री कल्याण,विद्याधर गुरव,गुरुनाथ नरुणे आदींनी अनुक्रमे प्रशासकीय माहिती,अमृत रसोई घर ,विध्याप्रवेश, मातापालक गट स्थापन,शाळा व्यवस्थापन समिती कार्य,शाळा प्रवेसोत्सव आदी विषयांवर उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन केले.सूत्रसंचालन शरणप्पा फुलारी यांनी केले तर शिवशरण म्हेत्रे यांनी आभार मानले.शिक्षण परिषदेसाठी केंद्रातील बहुसंख्य मुख्याध्यापक,शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होते .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कल्लय्या गणाचारी,राजशेखर कुर्ले,विद्याधर गुरव,राम सोलापूरे,शरद गांगोंडा,काशिनाथ फुलारी,राजशेखर खानापुरे, महिबुब नागणसुरे आदींनी परिश्रम घेतले.

# स्वेरीच्या डॉ. मोहन ठाकरे यांना केंद्रीय ऊर्जा विभागाकडून संशोधन पुरस्कार प्राप्त

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**
गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. मोहन पुरुषोत्तम ठाकरे यांना विद्युत अभियांत्रिकी क्षेत्रामध्ये उत्कृष्ट संशोधनाबद्दल दिल्ली येथील केंद्रीय ऊर्जा मंत्रालया अंतर्गत असलेल्या विद्युत विभागाच्या वतीने प्रतिष्ठेचा संशोधन पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार ३८ व्या भारतीय अभियांत्रिकी संमेलनाच्या जबलपूर (मध्य प्रदेश) मधील हॉटेल रॉयल ऑर्बिट मध्ये झालेल्या पारितोषिक वितरण समारंभामध्ये प्रदान करण्यात आला.




स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. ठाकरे यांच्या 'इंटरलाइन पॉवर फ्लो कंट्रोलर (आयपीएफसी)' दीर्घ प्रसारण लाईन्समध्ये तैनात करणे आणि त्याचा डिस्टन्स रिलेसवर होणारा परिणाम' या शीर्षकाच्या पुरस्कार विजेत्या पेपरला मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी मिळाली आहे. त्यांच्या या संशोधनाने विद्युत अभियांत्रिकी क्षेत्राला मौल्यवान योगदान प्राप्त झाले आहे. या सन्मानामुळे डॉ. ठाकरे यांचे कार्य इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग क्षेत्रात विशेष लक्षवेधी ठरले आहे. या पुरस्काराने स्वेरीच्या संशोधन आणि विकास कार्यास बळकटी मिळाली आहे. डॉ. मोहन पी. ठाकरे यांनी विविध प्रतिष्ठित जर्नल्स आणि परिषदांमध्ये एस.सी.आय. आणि स्कोपस इंडेक्स जर्नल्स मध्ये १२१ संशोधन पेपर्स प्रकाशित केले आहेत. त्यांची गुगल स्कॉलर संदर्भ संख्या ८९० आणि एच-इंडेक्स १७ आहे. गत वर्षात डॉ. ठाकरे यांनी प्रतिष्ठित जर्नल्समध्ये जवळपास आठ स्कोपस-इंडेक्स केलेले जर्नल पेपर्स प्रकाशित करून विद्युत अभियांत्रिकी क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या वर्षातच, डॉ. ठाकरे यांनी स्मार्ट ग्रीड तंत्रज्ञान, बॅटरी व्यवस्थापनासह इलेक्ट्रिक वाहने, फॅक्ट्स तंत्रज्ञान, मशीन ड्राईव्ज, एसी ट्रान्समिशन लाईन्स प्रोटेक्शन आणि एचव्हीडीसी ट्रान्समिशन लाईन्स यावर लक्ष केंद्रित करणारे १३ संशोधन पेपर्स प्रकाशित केले आहेत.डॉ. ठाकरे यांनी दोन अटल फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम्स (एफडीपी) आयोजित करण्यासाठी रु.७ लाखांचा निधी एआयसीटीई कडुन प्राप्त केला आहे. या निमित्ताने संस्थेतर्फे डॉ. ठाकरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. विद्युत अभियांत्रिकी क्षेत्रातील या उल्लेखनीय कामगिरीसाठी आणि महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल डॉ. मोहन ठाकरे यांचे स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, उपप्राचार्य डॉ. मिनाक्षी पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही.मांडवे, सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# तंत्रज्ञानाच्या सहाय्याने डाटा संकलन पद्धती विकसित कराव्यात : अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**
विकासाच्या विविध योजना राबविताना डाटा संकलन आणि विश्र्लेषणाच्या नवीन पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे, असे नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.राजगोपाल देवरा यांनी सांगितले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आज पद्मविभूषण प्रा. प्रशांत महालनोबीस यांच्या जन्मदिनानिमित्त नियोजन विभागाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयातर्फे १८ व्या राष्ट्रीय सांख्यिकी दिनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संचालनालयाचे संचालक डॉ. जितेंद्र चौधरी, अपर संचालक (समन्वय) कृष्णा फिरके, उपसचिव दिनेश वाघ, भारतीय प्रौद्योगिक संस्थानचे सहायक प्राध्यापक परमेश्र्वर उदमले आदींसह संचालनालयाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.डॉ. देवरा म्हणाले की, प्रा. प्रशांत महालनोबीस यांनी जी सांख्यिकीची पद्धत सुरू केली त्याचा आजही आपल्याला चांगला उपयोग होत आहे. या पारंपरिक पद्धतीचा अभ्यास करून नवीन पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढला असल्याने आपण त्यांचा वापर करत असताना एक नवीन डेटा तयार करीत असतो. पण तोच डेटा अचूक करण्यासाठीच्या पद्धतीचा अभ्यास करून त्याचा अवलंब करणे गरजेचे आहे.




डॉ. चौधरी म्हणाले की, सांख्यिकी माहिती नवयुवकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. योजना राबविताना सांख्यिकीची अत्यंत आवश्यकता आहे. या वर्षीच्या सांख्यिकी दिनाची संकल्पना विदा शी ठरविली आहे.प्रा. उदमले यांनी ग्रामीण भागासाठी विविध कामांच्या डेटा संकलनासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे पर्यायाबाबत माहिती दिली. सांख्यिकीय माहितीवर आधारित महाराष्ट्राची आर्थिक आकडेवारी २०२३, राज्यातील जिल्ह्यांचे व भारतातील राज्यांचे निवडक निर्देशक, पायाभूत सुविधा सांख्यिकी २०२१-२२ आणि २०२२-२३,शासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहिती कोष अहवाल २०२३, महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा २०१९-२०, राज्य शाश्र्वत विकास ध्येये प्रगती अहवाल २०२२-२३, शाश्र्वत विकास ध्येये कॉमिक, न्यू सीरीज ऑन स्टेट डोमेस्टिक प्रॉड्यक्ट ऑफ महाराष्ट्र, डीस्ट्रिक्ट डोमेस्टिक प्रॉडक्ट ऑफ महाराष्ट्र, नालिसिस ऑफ स्टेट बजेट ऑफ महाराष्ट्र, इस्टिमेट ऑफ ग्रोस फिक्स्ड, कॅपिटल फॉर्मेशन, वार्षिक उद्योग पाहणी अहवाल २०२०-२१ या प्रकाशनांचे प्रकाशन यावेळी करण्यात आले.

# पंढरीतील मराठा भवन भूमिपूजनाची निमंत्रण मुख्यमंत्र्यांनी स्वीकारले असे

## शिवसेनेचे संपर्कप्रमुख महेश साठे यांनी दिली

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**
पंढरीत मराठा भवन व्हावे याकरिता मागील अनेक वर्षाची मागणी होती ती मागणी मान्य होऊन इमारतीसाठी पाच कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे या इमारतीच्या भूमिपूजन समारंभासाठी राज्याची मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी उपस्थित रहावे यासाठी मराठा समाजाच्या वतीने निमंत्रण देण्यात आले आहे



राज्याचे मुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे यांना शिवसेनेचे सोलापूर जिल्हा लोकसभा मतदारसंघाचे संपर्कप्रमुख महेश साठे यांनी भेटून पंढरपुर येथील मराठा भवनाच्या भूमिपूजनाचे निमंत्रण दिले. यावेळी पंढरपूर मराठा समाज बांधवांच्या वतीने मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार महोदय यांचे आभार मानले व आपल्या सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्रातील पहिले मराठा भवन आपण पंढरपूर येथे मंजूर केले त्यास तात्काळ पाच कोटी रुपये देखील दिले असल्याने पंढरपूर येथील मराठा समाज बांधवांनी मुख्यमंत्री महोदय हे १७ जुलै रोजी पंढरपूर येथे महापूजेसाठी येत असल्याचे त्याच दिवशी मराठा भावनांची भूमिपूजन आपल्या हस्ते व्हावे असे निमंत्रण पत्राद्वारे विनंती करण्यात आली आहे हे निमंत्रण स्वीकारण मुख्यमंत्री यांच्याकडून या भूमिपूजन कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्यासाठी निमंत्रण स्वीकारले आहे. यावेळी छत्रपती शिवेंद्रराजे भोसले हेही उपस्थित होतेर



# एस.टी.शाळेच्या दारी

## पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ग्रामीण विद्यार्थ्यांना त्रेमासिक १००% सवलतीचा मोफत पास

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज** पंढरपूर तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स या महाविद्यालयात विद्यार्थिनींना मोफत बस प्रवास पासचे वाटप करण्यात आले. शासनाच्या ध्येयधोरणानुसार रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये एस.टी शाळेच्या दारी या उपक्रमा अंतर्गत पुण्यश्र्लोक अहिल्याबाई होळकर ग्रामीण विद्यार्थ्यांनी त्रेमासिक १००% सवलतीचा मोफत पासचे वाटप विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एस डी रोकडे व विभाग प्रमुख ग्रंथपाल उत्तम शिंदे , कलाशिक्षक तुकाराम खरात, क्रीडा शिक्षक गजानन जमदाडे एस टी पंढरपूर आगार वाहतूक नियंत्रक एस.व्ही अष्टेकर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी ७५ मुलींना मोफत पासचे वाटप झाल्या नंतर मुलींनी एसटी आगाराचे धन्यवाद मानले.

# स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या पंचायत समितीतच महिलांची कुचंबना

## स्वतंत्र स्वच्छ नाही नसल्याने महिलांना सहन करावे लागते ना हा त्रास राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या महिला अध्यक्ष वर्षा शिंदे यांनी दिला इशारा

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**
महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठल रुक्मिणीच्या पंढरी नगरीत आषाढी वारीच्या दरम्यान स्वच्छता दिंडीच्या माध्यमातून संपूर्ण राज्यातील येणाऱ्या भाविकांना स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या पंढरपूर पंचायत समिती तसेच पंढरपूर शहरातील ठिकठिकाणी महिलांची कुटुंबांना होताना दिसत आहे पंढरपूर शहरात ग्रामीण भागातून तसेच शहरातील विविध कामानिमित्त शहरात येत येतात तसेच आणि हजारो महिला भाविक पंढरपूरमध्ये दर्शनासाठी येतात परंतु या ठिकाणी शेकडो महिलांना स्वच्छालय जी पुरेशी सोय नसल्याने मोठ्या प्रमाणात नाहक त्रास सहन करावा लागत आहे मात्र असे असले तरी नगरपालिका आणि पंचायत समितीकडून गेल्या अनेक वर्षात यावर कसलाही ठोस पावली उचलली जात नसल्याने केवळ देखावासाठी स्वच्छता दिंडी काढली जाते का असा प्रश्न महिला वर्गातून उपस्थित केला जात आहे

पंढरपूर पंचायत समिती श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान मुळे संपूर्ण राज्यभरातून येणाऱ्या भाविक भक्तांना परिचित असलेले पंचायत समिती आहे व पंचायत समिती मार्फत आषाढी तसेच कार्तिकी वारीच्या दरम्यान स्वच्छता दिंडीच्या मार्फत थेट मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्री असते या दिंडीचा शुभारंभ करून संपूर्ण राज्यभरातील भाविक भक्तांसाठी स्वच्छता संदेश दिला जातो तसेच स्वच्छतेच्या कामासाठी दरवर्षी खोट्यावधी रुपयांचा खर्चही केला जातो तर दुसरीकडे मात्र पंचायत समितीच्या दुर्लक्षामुळे येथे कामासाठी येणारे शेकडून महिलांना स्वच्छालय जी पुरेशी सोयीद नसल्याने मोठी कुचुंबना व त्रास सहन करावा लागत आहे पंचायत समितीच्या पाठीमागील बाजूस पुरुषांसाठी मुतारी तसेच स्वच्छालय ची सोय आहे मात्र यावेळी महिलांसाठी केवळ एकच स्वच्छालय असून तेही जीर्ण तो बंद अवस्थेत असलेली दिसून येत आहे त्यामुळे महिलांची होणारी गैरसोय पंचायत समिती आणि नगरपालिका कधी थांबणार असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला जात आहे




यावेळी सोलापूर जिल्हा महिला अध्यक्ष वर्षाताई शिंदे यांनी सर्व ठिकाणची माहिती करून पंढरपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व पंढरपूर नगरपालिकेचे शिव यांना भेटून निवेदन देण्यात आले यावेळी त्यांना शहरातील वादळीच्या प्रमुख ठिकाणांची पाहणी करून तसेच सूचना सर्व अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आगामी येणाऱ्या आषाढी सोहळ्याच्या अगोदर सर्व सुविधा महिलांसाठी उपलब्ध करून द्याव्यात यावेळी त्यांच्या समेत राष्ट्रवादी पार्टी जिल्हाध्यक्ष सोलापूर उषाताई शिंदे रमेश शिंदे तालुका अध्यक्ष एडवोकेट सुखी शनी बागल तालुका उपाध्यक्ष रुपाली रणदिवे रेखा यादव तालुकावर्षा भोसले इत्यादी उपस्थित होतीर

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले ज्ञानोबा माऊलींच्या पादुकांचे दर्शन

## ‘ज्ञानोबा माऊली’च्या जयघोषात श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रस्थान

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

टाळ–मृदुंगाच्या तालावर भक्तिरसात चिंब झालेले वारकरी.... 'ज्ञानोबा माऊली', 'माऊली, माऊली' चा गजर.... डोक्यावर तुळशी वृंदावन, हाती दिंड्या–पताका घेतलेले वारकरी...अशा भक्तिमय वातावरणात आळंदी येथून आषाढी वारीसाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आज पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले.

आळंदी येथील संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिरात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी माऊलींच्या पादुकांचे दर्शन घेतले. यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार श्रीरंग बारणे, प्रधान सचिव प्रवीण दराडे, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन, नगर परिषदेचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे, श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्र्वस्त ड. राजेंद्र उमाप, विश्र्वस्त व पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजननाथ, विश्र्वस्त डॉ.भावार्थ देखणे, गुरु हैबतबाबा यांचे वंशज बाळासाहेब पवार – आरफळकर, ह.भ.प राणा महाराज वासकर, ह.भ.प संग्राम बापू भंडारे महाराज आदी उपस्थित होते. मानाच्या पालखी प्रदक्षिणेनंतर आळंदी संस्थान येथील गांधीवाडा देवस्थानाकडे पालखी सोहळ्याचे मुक्कामासाठी प्रस्थान झाले. प्रस्थान सोहळा 'याचि देही याचि डोळा'





अनुभवण्यासाठी मोठ्या संख्येने वारकरी आळंदीत दाखल झाले आहेत.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात वारकरी महाराष्ट्राची गौरवशाली आध्यात्मिक, सांस्कृतिक परंपरा असलेल्या पंढरपूर वारीचे जागतिक नामांकनासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पाठवण्याची घोषणा, वारीतल्या मुख्य पालख्यांतील दिंड्यांना प्रतिदिंडी २० हजार रुपयांचे अर्थसाह्य आदी महत्वपूर्ण निर्णय घेतल्याबद्दल वारकरी संत महंत पाईक संघटना मधील प्रमुख महाराज यांच्यावतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी वारकरी संप्रदायातील मान्यवरांसोबत संवाद साधला. वारकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत २१ ते ६० वर्ष वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १ हजार ५०० रुपये लाभ देण्याचा निर्णय घेतल्याबद्दल येथील महिलाच्यावतीने मुख्यमंत्री श्री. शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.


### वारकऱ्यांसाठी शासनातर्फे सुविधा

आषाढी वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांना सोई–सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हा प्रशासन, मंदीर संस्थान, पुणे व पिंपरी–चिंचवड मनपाने तयारी केली आहे. आळंदीत पाण्याची सोय, विजेची सोय, वैद्यकीय पथके, पालखी मार्गाचे वेळापत्रक, मंदिराच्या प्रवेशद्वारावर धातूशोधक यंत्रणा, सुलभ शौचालय, पोलीस मदत केंद्र, अग्निशमन यंत्रणा, रुग्णवाहिका, नदी पात्रात बोटीची व्यवस्था, सूचना फलक अशी व्यवस्था करण्यात आली असून जागोजागी सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात आलेल्या आहेत. तसेच ध्वनीक्षेपणाद्वारे सूचनाही देण्यात येत आहे.

# चिखली तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाचा विभागाचा सावळा गोंधळ तर तहसीलदार म्हणतात केवायसी करा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा/राहुल साबळेः चिखली तालुका पुरवठा अधिकारी यांच्या नियोजन शून्य कारभारामुळे राशन कार्ड मधील जे नावे होते ते ऑनलाईन कट करण्यात आले आहे हा विषय दोन महिन्याचा आहे ज्या व्यक्तींची नावे कमी झाले त्यांनी पुरवठा विभागातील संबंधित व्यक्तीकडे सर्व घरातील व्यक्तीचे आधार कार्ड सुद्धा नेऊन दिले आहे परंतु त्या व्यक्तीचा माल रेशन दुकानांमध्ये आलेला नाही आणि आता म्हणतात केवायसी करा नाहीतर मला भेटणार नाही ज्या व्यक्तीचे नावे कट झाले ऑनलाइन कट झाली आहे त्यांची नावे मशीनमध्येच नाहीतर ते केवायसी कुठे करणार या बाबीचा सुद्धा माननीय तहसीलदार महोदय यांनी विचार करायला पाहिजे कागदपत्राची पूर्तता करून सुद्धा ज्या व्यक्तीचे नावे कट झाले त्यांचा माल राशेन दुकानांमध्ये आलेला नाही ते दोन महिन्यापासून धान्यापासून वंचित ठेवण्यात



आली आहे चिखली तालुका पुरवठा अधिकारी चव्हाण मॅडम यांना कागदाची पूर्तता करून सुद्धा त्यांनी ते जी नावे कट झाली आहेत त्या व्यक्तींचा माल रेशन दुकानदार यांना दिलेला नाही त्यामुळे हा सावळा गोंधळ दिसून येत आहे व ज्या व्यक्तीचा माल स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडे आला नाही त्याला ते देत सुद्धा नाही तुमचा माल आलेला नाही तुमचे नाव ऑनलाईन कट झाले आहे तुमच्या नावाचा माल आल्यानंतर देऊ असे उत्तर देत आहे त्यामुळे ज्या व्यक्तींची नावे कमी झाली आहेत त्यांना दोन महिन्यापासून पुरवठा विभागाच्या सावळ्या गोंधळामुळे राशेन मालापासुन वंचित राहावे लागले आहे सदर लाभार्थी हे केवायसी पासून वंचित राहत आहे तरी या विषय कडे चिखली तहशिलचे तहशिलदार संतोष जी काकडे यांनी लक्ष देऊन वंचित असलेल्या राशन धारकांना लवकरात लवकर धान्य कसे मिळेल व केवायसी पासून वंचित राहिले नाही पाहिजे यांकडे लक्ष देण्याची गरज आहे

# राज्याच्या अर्थसंकल्पात भरीव तरतूद केल्याबद्दल भगिनींनी मानले मुख्यमंत्री भाऊरायाचे आभार

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राज्याच्या अर्थसंकल्पात महिला– भगिनींसाठी अनेक निर्णय घेऊन त्यांना दिलासा दिल्याबद्दल विविध क्षेत्रातील महिला– भगिनींनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ओवाळून राखी बांधत त्यांचे आभार मानले. तर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी १ जुलैपासून करत असल्याचे सांगत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी त्यांना अनोखी ओवाळणी दिली.



विधानभवनाच्या प्रांगणात आज विविध क्षेत्रातील महिला भगिनी एकत्र जमल्या होत्या. विधिमंडळात काल सादर झालेल्या अर्थसंकल्पात महिलांसाठी अनेक निर्णय घेण्यात आले. या निर्णयामुळे राज्यातील महिलांना मोठा दिलासा मिळाल्याने त्यांनी मुख्यमंत्री श्री.शिंदे यांना ओवाळून राखी बांधून त्यांचे आभार मानले.यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, अर्थसंकल्पात राज्यातील महिला– भगिनींना दिलासा देणारे अनेक निर्णय आम्ही घेतले आहेत. मुख्यमंत्री माझी बहिण योजनेचा शासन निर्णयदेखील तातडीने काढण्यात आला असून त्याचा लाभ येत्या १ जुलैपासून भगिनींना देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील महिलांना दरमहा पंधराशे रुपये मिळणार आहेत. या निर्णयाचा फायदा अडीच कोटींहून जास्त महिलांना होणार आहे.

महिलांना वर्षातून ३ सिलेंडर मोफत देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनाही सुरू करण्यात येणार आहे. तसेच २५ लाख महिलांना लखपती दीदी बनवण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. बचतगटांतील महिलांचे खेळते भांडवल १५ हजारावरून वाढवून ३० हजार केले आहे. मुलींना उच्च शिक्षणापर्यंतचे शिक्षण मोफत देण्याचा, १० हजार महिलांना पिंक रिक्षांचे वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच महिलांना मोफत प्रवास, ५० टक्क्यांपर्यंत मोफत एसटी प्रवास यापूर्वीच दिलेला आहे, राज्यातील सर्व माता–भगिनींच्या पाठीशी त्यांचा मुख्यमंत्री भाऊराया म्हणून नेहमी पाठीशी असल्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. राखी बांधल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी सर्व भगिनींचे आभार मानले. यावेळी मंत्री दादाजी भुसे, आमदार प्रताप सरनाईक, आमदार नरेंद्र भोंडेकर आणि विविध क्षेत्रातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# कोणताही खेळाडू शासकीय सेवेच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची काळजी घेणार

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचे अनेक खेळाडू उत्तम कामगिरी करीत आहे. महाराष्ट्राचा नावलौकिक वाढविण्याऱ्या या खेळाडूंना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार शासकीय नोकरी देण्यासाठीचे निकष निश्र्चित करण्याबाबतचा निर्णय नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. महाराष्ट्राचे नाव राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचाविणारा कोणताही खेळाडू या निर्णयाच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी आवश्यकता असल्यास निकषांमध्ये आणखी मुद्दे समाविष्ट करण्यात येतील, असे आश्र्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिले.

उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी पॉईंट ऑफ




इन्फर्मेशनच्या माध्यमातून सदस्य हिरामण खोसकर यांच्याकडून खेळाडू कविता राऊत हिला उपजिल्हाधिकारी किंवा जिल्हा उपअधीक्षक पदावर नोकरी देण्याबाबत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यासंदर्भात माहिती दिली. उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, राज्यातील विविध खेळांना, खेळाडूंना शासनाकडून नेहमीच प्रोत्साहन देण्यात येत आहे. ज्या खेळाडूंनी राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तम कामगिरी करून, पदक प्राप्त करून राज्याचा लौकिक वाढविला आहे, त्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचा निर्णय यापूर्वीच घेतला आहे. त्याचे निकषही निश्र्चित करण्यात आले आहेत. सभागृहातील सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन या निकषांमध्ये आणखी काही मुद्दे समाविष्ट करण्याबाबत निश्र्चित विचार करण्यात येईल, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

# पीक विमा भरण्यासाठी आगाऊ पैसे मागणाऱ्यांची तक्रार करण्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांचे आवाहन

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगामासाठी एक रुपयात पीक विमा भरणे प्रक्रिया सुरु आहे. मात्र राज्यात काही ठिकाणी सीएससी केंद्र चालक हे शेतकऱ्यांकडून एक रुपयाच्या वर अवैधरित्या काही आगाऊ रकमा वसूल करत असल्याचा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. आगाऊ पैसे वसूल करणाऱ्या केंद्र चालकांची पुराव्यासह तक्रार आल्यास त्यांच्यावर कारवाई करणार असून अशा लोकांची अजिबात गय केली जाणार नाही, असा इशारा राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिला आहे.मंत्री श्री. मुंडे यांनी शेतकऱ्यांना आगाऊ पैसे मागणाऱ्या सीएससी केंद्र चालकांची शक्य असेल त्या पुराव्यासह राज्य शासनाचा कृषी हेल्पलाइन व्हाट्सअप क्रमांक ९८२२४४६६५५ या क्रमांकावर व्हॉट्सअप द्वारे थेट तक्रार करावी किंवा स्थानिक तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे याबाबत तक्रार द्यावी, असे आवाहन केले आहे. अशा केंद्र चालकांवर ग्रामविकास विभागाच्या मदतीने कडक कारवाई केली जाईल.शेतकऱ्यांना पीक विम्याचा एक अर्ज भरण्यासाठी एक रुपया इतकीच रक्कम पोर्टलवर भरणे अपेक्षित आहे, तर यासाठी संबंधित केंद्र चालकाला शासनाकडून प्रति विमा अर्ज ४० रुपये मानधन दिले जाते. मात्र, काही केंद्र चालक सात–बारा ऑनलाइन काढणे, पेरणी प्रमाणपत्र यासारख्या बाबींच्या नावाने शेतकऱ्यांना आगाऊ पैसे मागत असल्याच्या तक्रारी येत आहेत, या विरोधात आता मंत्री श्री. मुंडे यांनी कडक भूमिका घेतली आहे.

# संघर्षनायक केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले गौरवग्रंथासाठी रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी आपले जुने फोटो आणि अनुभव पाठविण्याचे आवाहन

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांचे कार्यकर्तुत्व इतिहास घडविणारे ठरले आहेत.त्यांच्या कार्यकर्तुत्वाचा ४५ वर्षाचा आढावा घेणारा आणि त्यांच्या कार्यकर्तुत्वाचा गौरव करणारा संघर्षनायक रामदास आठवले या गौरव ग्रंथाचे लेखन संपादन रिपब्लिकन पक्षाचे प्रसिध्दी प्रमुख हेमंत रणपिसे करीत आहेत.संघर्षनायक रामदास आठवले गौरव ग्रंथाचे येत्या ऑगस्ट मध्ये मुंबईत प्रकाशन करण्यात येणार आहे.त्यामुळे या गौरव ग्रंथात रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी आपल्या जुन्या आठवणी जुने फोटो लोकनेते रामदास आठवले यांच्या नेतृत्वाबद्दल आवडणारे गुण त्यांच्या बद्दलचा अनुभव येत्या १० जुलै पर्यंत खालील



दिलेल्या पत्त्यावर,ईमेल वर मोबाईल वर पाठवावा असे आवाहन या गौरव ग्रंथाचे लेखक हेमंत रणपिसे यांनी केलेले आहे.

संघर्षनायक रामदास आठवले गौरव ग्रंथासाठी साप्ताहिक स्टार महाराष्ट्र च्या वतीने या गौरव ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. संघर्षनायक रामदास आठवले गौरव ग्रंथासाठी आपले जुने फोटो स्कॅन करुन रामदास आठवले यांच्या बाबत गुणगौरवाचे अनुभव लिहुन republicannews@gmail.com या ईमेलवर आणि या ९००४४८८४६५ व्हॉटसअप नंबरवर येत्या १० जुलै २०२४ पर्यंत पाठवावे असे आवाहन करण्यात आले आहे.संघर्षनायक रामदास आठवले हा गौरव ग्रंथ ऐतिहासिक ग्रंथ ठरणार आहे आणि या ऐतिहासिक ग्रंथात आपले फोटो आणि अनुभव समाविष्ट करण्यासाठी रिपब्लिकन कार्यकर्त्यांना १० जुलै पर्यंत आपले साहित्य पाठविण्याची संधी देण्यात येत आहे. republicannews@gmail.com या ईमेलवर आपले फोटो आणि लेख या गौरव ग्रंथासाठी पाठवावेत.असे नम्र आवाहन रिपब्लिकन पक्षाचे प्रसिध्दी प्रमुख आणि गौरव ग्रंथाचे लेखक हेमंत रणपिसे यांनी केले आहे.

# दोन लाचखोर कर्मचाऱ्यांना ४ वर्षे सक्तमजुरी, ५० हजारांचा दंड

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

बडतर्फीनंतर पुन्हा सेवेत रुजू झालेल्या एका शाळेतील शिपायाचे थकीत वेतन व अन्य देय रकमा अदा करण्यासाठी २३ हजार रूपयांची लाच घेतल्याबद्दल सोलापूरच्या भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालयातील तत्कालीन वरिष्ठ लिपिकासह संबंधित शाळेतील कर्मचाऱ्याला सोलापूरच्या न्यायालयाने दोषी ठरवून चार वर्षे सक्तमजुरीसह प्रत्येकी ५० हजार रूपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालयातील तत्कालीन वरिष्ठ लिपीक संतोष जनार्दन ठाकूर (सध्या सेवानिवृत्त) आणि महालक्ष्मी प्रशालेतील तत्कालीन प्रयोगशाळा परिचर उमेश प्रकाश काळे अशी शिक्षा सुनावण्यात आलेल्या दोघा आरोपींची नावे आहेत. अतिरिक्त सत्र न्यायाधीश योगेश राणे यांनी खटल्याचा निकाल जाहीर केला. या खटल्यातील लाच लुचपतीची कारवाई २०१६ साली म्हणजे आठ वर्षापूर्वी झाली होती. संबंधित तक्रारदार एका शाळेत शिपाईपदावर कार्यरत असताना एका प्रकरणात दोषी ठरवून त्यास सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. न्यायालयीन लढाईनंतर त्यास पुन्हा सेवेत रुजू करून घेण्यात आले. बडतर्फीच्या काळातील त्याच्या थकीत वेतनासह अन्य देय रकमा मिळण्यासाठी त्याने वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालयात अर्ज दाखल केला होता. त्यानुसार देय रकमा मंजूर करून अदा करण्यासाठी तेथील वरिष्ठ लिपीक संतोष ठाकूर याने लाच मागितली. ही लाच दुसरा आरोपी उमेश काळे याच्या मदतीने घेताना दोघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पकडले होते. या खटल्यात सरकारतर्फे ड. दत्तूसिंग पवार यांनी केलेला युक्तिवाद न्यायालयाने मान्य करून दोन्ही आरोपींना शिक्षा व दंड ठोठावला.